# मिरा भाईंदर महानगरपालिका

नगररचना विभाग

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.बी. स्कूलच्या बाजूला, काशिमिरा, मिरारोड (पू.)

जा.क्र. मनपा/नर/ 9830/2018-19

टनन ७

// भाग भोगवटा दाखला //

प्रति,

1) श्री. अविनाश म्हात्रे ॲण्ड असो., (वास्तुविशारद)
101, वेस्ट व्ह्यू, ऐ-2, सेक्टर-II,
शांती नगर, मिरारोड (पूर्व), जिल्हा ठाणे - 401107.

2) मे. रवि डेव्हलपमेंट (विकासक)
हर्ष प्लाझा, पहिला मजला, शांतीनगर, मिरारोड (पूर्व).

विषय- मौजे पेणकरपाडा, स.क्र. 226पै, 227पै., 228पै., 229पै., 230पै., मौजे मिरा, स.क्र. 150पै., 151पै., प्रस्तावित इमारत टाईप -ई (बिल्डींग नं.01) टाईप- बी-1 (बिल्डींग क्र. 02), टाईप-ई-1 (बिल्डींग क्र. 03) (बेसमेंट + पार्ट तळमजला + पार्ट पोडियम + 1 ते 20 पार्ट मजले) करीता (वास्तुविशारद प्रस्तावित क्लस्टर -2, पुनम इस्टेट) साठी As Built नकाशानुसार भागभोगवटा दाखला मिळणेबाबत.

संदर्भ- 1) मे. अविनाश म्हात्रे ॲण्ड असो., (वास्तुविशारद) यांचा दि.02/03/2018, दि.23/04/2018 रोजीचा प्रस्ताव

2) मिरा भाईंदर महानगरपालिकेकडील पत्र क्रमनपा/नर/2657/2013-14, दि.18/10/2013 अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी.

3) मिरा भाईंदर महानगरपालिकेकडील पत्र क्र. मनपा/नर/3436/2013-14, दि.12/12/2013 अन्वये जोत्याचा दाखला.

4) मे. अविनाश म्हात्रे ॲण्ड असो., (वास्तुविशारद) यांचेकडील दि.19/03/2018 रोजीचा इमारत पुर्णत्वाचा दाखला.

5) मे. जितेंद्र देओलकर यांनी इमारतीचे बांधकाम तांत्रिकदृष्ट्या योग्यतेबाबतचा (Structural Stability Certificate) दि.27/07/2017 रोजीचा दाखला

6) मे. विजय गुरव ॲण्ड असो., यांचा दि.03/07/2017 रोजीचा प्लबींग बाबतचा दाखला.

7) सोलार वॉटर हिटींग सिस्टीम बसवून कार्यान्वीत केलेबाबतचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील पत्र क्र.मनपा/सांबा/3088/2017-18, दि.07/07/2017 अन्वयेचा दाखला.

8) रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्पाची उभारणी केलेबाबतचे पाणीपुरवठा विभागाकडील पत्र क्र.मनपा/पापु/815/2017-18, दि.13/06/2017 अन्वयेचा दाखला.

9) अग्निशमन विभागाकडील पत्र क्र. पत्र क्र.मनपा/अग्नि/1219/2017-18, दि.30/01/2018 अन्वये अंतिम नाहरकत दाखला.

10) विकासकाचे दि.22/03/2018 रोजीचे शपथपत्र.

विषयांकित जागेमधील मौजे पेणकरपाडा, स.क्र. 226पै, 227पै., 228पै., 229पै., 230पै., मौजे मिरा, स.क्र. 150पै., 151पै. या जागेतील प्रस्तावित इमारत टाईप -ई (बिल्डींग नं.01) टाईप- बी-1 (बिल्डींग क्र. 02), टाईप-ई-1 (बिल्डींग क्र. 03) (बेसमेंट + पार्ट तळमजला + पार्ट पोडियम + 1 ते 20 पार्ट मजले) करीता (वास्तुविशारद प्रस्तावित क्लस्टर -2, पुनम इस्टेट), क्षेत्र 24934.33 चौ.मी. रहिवास + वाणिज्य साठी As Built नकाशाप्रमाणे वास्तुविशारद मे. अविनाश म्हात्रे ॲन्ड असो., (नोंदणी क्र. सीए/75/1274) यांच्या देखरेखीखाली पुर्ण झालेले असून सदरचे बांधकाम तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्याबाबत संरचना अभियंता मे. जितेंद्र देओलकर यांनी व सदर इमारतीच्या प्लंबींगचे काम योग्य झालेबाबत परवानाधारक मे. विजय गुरव ॲण्ड असो. यांनी दाखले दिलेले आहेत, यास्तव सदर वरीलप्रमाणे साठी खालील अटीशर्तीच्या अधिन राहुन इमारतीसाठी As built नकाशाप्रमाणे भाग भोगवटा दाखला देण्यात येत आहे.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

नगररचना विभाग

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)

४

दिनांक:- ७।७।२०१८

जा.क्र. मनपा/नर/१७३०/२०१

टनन-७ ([illegible])

दस्त क्र. ५५९३ /२०२४

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR THANE No. 7 — सह दुय्यम निबंधक ठाणे क्र. ७ — सत्यमेव जयते — जि. ठाणे

अटीशर्ती

1) संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वयेच्या बांधकाम परवानगी / सुधारीत बांधकाम परवानगी मधील अटीशर्तीचे व विकासकीच्या संदर्भ क्र. 10 अन्वयेच्या हमीपत्राचे पालन करणे बंधनकारक राहिल.

2) जर

अ) मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आवश्यकता वाटल्यास कोणत्याही प्रकारची पुर्तता करणेस कळविल्यानंतर किंवा कोणताही प्रकारचा प्रतिबंध केल्यानंतर त्याचे पालन नाही केल्यास.

ब) आपण कोणत्याही प्रकारची माहिती लपवून किंवा चुकीची माहिती सादर करुन परवानगी / भोगवटा दाखला प्राप्त करुन घेतल्याचे मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची खात्री झालेनंतर सदरचा दाखला रद्द करणेचे अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत

3) सदर इमारतीच्या बांधकामामध्ये भविष्यात कोणत्याही प्रकारचे फेरबदल करावयाचे झाल्यास त्याबाबत महानगरपालिकेची परवानगी प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

4) सदरच्या दाखल्यामध्ये नमुद केलेल्या वापरा व्यतिरिक्त भविष्यात बदल केल्याचे निदर्शनास आल्यास सदरचा दाखला रद्द समजणेत येवून पुढील कार्यवाही करणेत येईल.

5) सदरच्या दाखल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 मधील कोणत्याही तरतुदी अन्वयेच्या कार्यवाहीसाठी बाधा येणार नाही.

6) सदरच्या दाखल्यामुळे अर्जदारास त्यांच्या मालकीच्या नसलेल्या कोणत्याही जमिनीचा कोणत्याही प्रकारे वापर करता येणार नाही.

7) सदर जागेच्या मालकीबाबतच्या मा. न्यायालयात सुरु असलेल्या दाव्याबाबत मा. न्यायालयाच्या आदेशाचे पालन करणे विकासकावर बंधनकारक राहील. त्याबाबत महानगरपालिकेची कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही.

8) अर्जदारांनी सादर केलेल्या दि.22/03/2018 रोजीच्या शपथपत्राप्रमाणे मलनिस्सारण व्यवस्था, सांडपाणी व्यवस्था, पाणीपुरवठा व्यवस्थाबाबत देखभाल दुरुस्ती करणे बंधनकारक राहिल.

9) सदर इमारतीचा वापर सुरु करणेपुर्वी सदर दाखला वेळी सादर केलेल्या सर्व विभागाकडील नाहरकत दाखला / प्रमाणपत्र / परवानगी यामधील अटीशर्तीची पुर्तता करणे बंधनकारक राहिल.

10) संदर्भिय पत्र क्र.10 मधील हमीपत्रांचे पालन करणे आपणांवर बंधनकारक राहिल.

11) रेखांकनामधील वाहनतळाची जागा जागा कायमस्वरुपी सार्वजनिक वापरासाठी खुली ठेवणे बंधनकारक राहिल.

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर.

(बी.जी. पवार)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत - 1) कर संकलक व निर्धारक

2) विभाग प्रमुख, अतिक्रमण तथा अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका